## बृहन्मुंबई महानगरपालिका

### संचालक (वै.शि. व प्र.रु.) यांचे कार्यालय

नायर रुग्णालय दंत महाविद्यालय, मुंबई-400008.

क्र. संचालक/वै.शि.प्र.रु./4686 दि.12/10/2013

विषयः बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकिय / दंत महाविद्यालयातील अध्यापकीय कर्मचा-यांना खाजगी वैद्यकिय व्यवसायास परवानगी देणेबाबत

संदर्भ: 1) शासन निर्णय क्र. मं.मं.नि.-2008/प्र.क्र.44/2008/वैसेवा-2 दिनांक 27-3-2008

2) महानगरपालिका ठराव क्र. 257 दि. 9-7-2009

3) परिपत्रक क्र. साप्रवि/2/एफजीआर/20 दि. 5-9-2009

उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार परिपत्रकान्वये अधिव्याख्यात्यांना खाजगी व्यवसाय करण्याचा विकल्प दिला असून सदर विकल्प फक्त व्यवसायरोध भत्त्याऐवजी स्विकारता येईल.

महापालिकेच्या वैद्यकिय/दंत महाविद्यालयातील सर्व विभागातील विभाग प्रमुख / पूर्णवेळ प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक व किमान 3 वर्षे सेवा पूर्ण केलेले अधिव्याख्याता यांना पुढील प्रमाणे विकल्प उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

1) त्यांना पुर्णवेळ सेवा खाजगी व्यवसाय न करता सर्व भत्त्यांसह असलेल्या वेतनश्रेणीत राहता येईल, अथवा

1516

2) खाजगी व्यवसायरोध भत्त्यांविना (एनपीपीए) खाजगी व्यवसाय करणे या सवलतीचा लाभ घेता येईल.

खाजगी वैद्यकिय व्यवसाय करण्याचा विकल्प स्विकारणा-या अध्यापकांना रुग्णालयाच्या परिसराबाहेर कार्यालयीन वेळेनंतर खाजगी वैद्यक व्यवसाय करण्याची अथवा कोणत्याही एका खाजगी रुग्णालयात रुग्णालयीन सेवा पुरविण्याची मुभा राहील. तथापी, खाजगी रुग्णालयातील रुग्णालयीन सेवा नोकरी सारखी करता येणार नाही. कार्यालयीन वेळेत खाजगी वैद्यकिय व्यवसाय करण्याची बाब निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच, संबंधितांविरुद्ध मुंबई महापालिका (वर्तणूक) नियम 1999 व मुंबई महापालिका (शिस्त व अपील) नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

असे निदर्शनास आले आहे की, बरेचसे विभाग प्रमुख / पूर्णवेळ प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक व अधिव्याख्याता हे खाजगी व्यवसायाचा विकल्प न स्विकारता व्यवसायरोध भत्त्याचा लाभ घेऊनसुद्धा खाजगी व्यवसाय करीत आहेत.

सदर प्रत माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत देण्यात आली आहे.
जन माहिती अधिकारी

HC(?)CE – 2197

त्यामुळे या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की,

1) अजूनपर्यंत ज्या अध्यापकांनी खाजगी व्यवसायरोध भत्त्यांविना (एनपीपीए) खाजगी व्यवसायाचा विकल्प स्विकारला नसेल त्यांनी पुढील एक महिन्याच्या कालावधीत सदरहू विकल्प स्विकारत असल्याबद्दल होकारार्थी किंवा नकारार्थी स्वरूपाचे पत्र संबंधित अधिष्ठाता यांच्याकडे सादर करावे.

2) ज्यांनी या अगोदरच खाजगी व्यवसायाचा विकल्प स्विकारला असेल त्यांनी त्यांच्या खाजगी वैद्यकिय व्यवसायाचे जागेचा पत्ता किंवा रुग्णालयाचे नाव व पत्ता संबंधित अधिष्ठाता यांच्याकडे सादर करावा.

12/10/13

संचालक (वै.शि. व प्र.रू.)

अधिष्ठाता (गो.सु.वै.म. व रा.ए.स्मा.रुग्णालय)

अधिष्ठाता (लो.टि.म.स.रू. व वै.म.)

अधिष्ठाता (टो.रा.वै.म. व बा.य.ल.ध.रुग्णालय)

अधिष्ठाता (नायर रुग्णालय दंत महाविद्यालय)

All HOD's

ansupe
21/10

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि वैद्यकिय महाविद्यालय, शीव.
17 OCT 2013 DIM
मुंबई - ४०० ०२२.
आवक क्रमांक ....... 2695

सदर प्रत माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी
लो.टि.म.स. रुग्णालय व
वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुं.-22

(8)